# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१६-१७/ 4472 दिनांक : 02 NOV 2016

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था ,
पुणे विभाग.

विषय :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केल्याप्रमाणे संस्थेच्या नियामक मंडळावर संबंधित प्रादेशिक विभागातून उद्योजक/तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ यातून शासन प्रतिनिधी नामनिर्देशित करण्याबाबत
संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/बीओएम/२०१६/२११४ दि.०३.१०.२०१६

उपरोक्त विषयाबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने प्रसिद्ध केलेल्या अप्रुव्हल प्रोसेस हंड्बूक मधील परिशिष्ठ १९ मधील (Appendix 19 h ) नुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये "An Industrialist/technologist/educationist from the region to be nominated by the State Govrnment " असे नमूद करण्यात आले आहे. त्यास अनुसरून संबंधित प्रादेशिक विभागातून उद्योजक/तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ यातून शासन प्रतिनिधी नियुक्त करण्याचे प्रावधान आहे.त्याचप्रमाणे Natinal Board of Accreditation कडून नामांकनाकरितासुद्धा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकांची पूर्तता करणे गरजेचे आहे.

संस्थांच्या नियामक मंडळावर उद्योजक/तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ यातून शासन प्रतिनिधी यांची नियुक्ती करावयाची असल्याने संदर्भीय पत्रातील निकषांप्रमाणे आपल्या प्रादेशिक विभागातून (आपल्या जिल्ह्यातील) इच्छुक उद्योजक/तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ यांची माहिती या कार्यालयास सदर इच्छुक व्यक्तीच्या संमतीपत्रासह तात्काळ (दिनांक १०.११.२०१६ पर्यंत) सादर करावी. सोबत संदर्भीय पत्राची छायांकित प्रत जोडली आहे.

Baikwad 2/11/16
सहसंचालकाकरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे

प्रत,

१)मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांना माहितीसाठी.(कार्यासन क्र.२)
२)प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महविद्यालये,पुणे विभाग यांनी त्यांचे संस्थेतील संदर्भीय पत्रातील निकषांप्रमाणे इच्छुक तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ यांची माहिती या कार्यालयास कळवावी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांकः२/एनजीसी/बीओएम/२०१६/२११४

दिनांक : 3 OCT 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, औरंगाबाद,

नाशिक, अमरावती, नागपुर.

विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केल्याप्रमाणे संस्थेच्या नियामक मंडळावर संबंधित प्रादेशिक विभागातून उद्योजक/तंत्रज्ञ/शिक्षणतज्ञ/ यातुन शासन प्रतिनिधी नामनिर्देशित करण्याबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०६/तांशि-४, दि.७.०९.२०१६

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक नुसार नियामक मंडळ गठीत करण्याचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. त्यामधील परिशिष्ठ १८ (Appendix 18 h) नुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये "An Industrialist /technologist/ educationist from the region to be nominated by the state Government. " असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन संबंधित प्रादेशिक विभागातुन उद्योजक, तंत्रज्ञ आणि शिक्षणतज्ञ यातुन शासन प्रतिनिधी नियुक्त करण्याचे प्रावधान आहे. त्याचप्रमाणे National Board of Accreditation कडुन नामांकनाकरीतासुध्दा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मानकांची पुर्तता करणे गरजेचे आहे.

राज्यातील व्यावसायिक पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नियामक मंडळावर संबंधित प्रादेशिक विभागातुन उद्योजक, तंत्रज्ञ आणि शिक्षणतज्ञ यातुन शासन प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक असुन या कामकाजामध्ये सुसुत्रता येणाच्या दृष्टीकोनातून संदर्भाधीन शासन पत्रान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना त्यांचे स्तरावर उद्योजक, तंत्रज्ञ आणि शिक्षणतज्ञ यातुन शासन प्रतिनिधी नियुक्त करण्याकरीता प्राधिकृत करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

वि वि

उपरोक्त सर्व बाबींच्या अनुषंगाने संस्थांच्या नियामक मंडळावर उद्योजक, तंत्रज्ञ आणि शिक्षणतज्ञ निवडण्याकरीता पुढीलप्रमाणे निकष सूचीत करण्यात येत असुन त्याचे तंतोतंत पालन करुन आपल्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांबाबत (ज्या प्रकरणी विनिर्दीष्ठपणे नामनिर्देशीत केलेले नाही अशा) सदर कार्यवाही करण्यात यावी, कार्यपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

- उपरोक्त विषयाबाबतचे सर्व नस्ती विभागीय कार्यालयांकडे जतन करण्यात याव्यात.
- सदर बाबत शासन / तंत्रशिक्षण संचालनालय/ लेखापरिक्षण विषयक संस्था शासनाची विविध प्राधिकरणे यांनी वेळोवेळी मागणी करताच सदर नस्ती संबंधितांना सादर करण्याची जबाबदारी विभागीय कार्यालयाची असेल.

\\DTENS1\Desk2\Datta\2016\09 BOM NOMEENI (INDUSTRY).Docx


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
10 OCT 2016
12670
आवक क्र.

- सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचा नियामक मंडळ गठीत केल्याबाबतचा एकत्रित अहवाल शासनास सादर करुन त्याची प्रत संचालनालयास सादर करावी.
- याबाबत स्वतंत्र परिपत्रकान्वये आपल्या अधिनस्त पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांच्या ही बाब निदर्शनास आणुन देण्यात यावी. तसेच विषयांकीत बाबीकरीता थेट शासनास / संचालनालयास प्रस्ताव सादर न करता ते विभागीय कार्यालयास सादर करण्याबाबतही संस्थांना कळविण्यात यावे.

**राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये नियामक मंडळावर उद्योजक, तंत्रज्ञ, शिक्षणतज्ञ यांच्या निवडीकरीताचे निकष :-**

| प्रकार/ निकष | उदयोजक | तंत्रज्ञ | शिक्षणतज्ञ |
|---|---|---|---|
| पात्रता | किमान ५० तांत्रिक मनुष्यबळ कार्यरत असलेल्या उद्योगाशी निगडीत उद्योजक व्यक्ती. | संबधित अभ्यासक्रमातील पदवी / पदव्युत्तर पदवी/ पीएचडी धारक/ उदयोगक्षेत्रातील उच्च पदावरील अनुभव असलेली व्यक्ती. | संबधित अभ्यासक्रमातील पदवी/ पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडी धारक व्यक्ती. |
| अनुभव | १० वर्ष | तांत्रिक शाखेतील पदवी : २० वर्ष<br>पदव्युत्तर पदवी : १५ वर्ष<br>पीएचडी पदवी : ०५ वर्ष<br>त्यापैकी उच्च पदावरील अनुभव किमान ५ वर्ष | तांत्रिक शाखेतील पदवी : २० वर्ष<br>पदव्युत्तर पदवी : १५ वर्ष<br>पीएचडी पदवी : ०५ वर्ष |
| कार्यक्षेत्र | प्रादेशिक क्षेत्रातील नामांकित तथा नावाजलेला उद्योग समुह. | संशोधन संस्था / शैक्षणिक संस्था / उदयोगक्षेत्र. | संशोधन संस्था / शैक्षणिक संस्था किंवा तंत्रशिक्षण प्रशासनाशी संबंधित. |
| प्राधान्यासाठी अनुषंगिक अर्हता | १. गेल्या ५ वर्षातील उद्योग क्षेत्रात उल्लेखनिय योगदान<br>२. उद्योग क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबाबत मिळालेले पुरस्कार<br>३. प्रादेशिक विभागाच्या गरजेनुसार उपक्रम राबविणे | १. उद्योग क्षेत्र / संशोधन संस्थामधील उच्च पदस्थ अनुभव.<br>२. आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय परिषदेस पेपर सादरीकरण / शोध निबंध / पुस्तक प्रकाशन/ पेटंट ०२/<br>३. शासकीय संशोधन संस्था तथा उदयोग क्षेत्रतील सेवानिवृत्त नामवंत व्यक्ती. | १. पी.एच.डी. गाईड<br>२.आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय परिषदेस पेपर सादरीकरण / शोध निबंध / पुस्तक प्रकाशन/ पेटंट<br>३. शासकीय संशोधन संस्था तथा शैक्षणिक संस्थेतून / प्रशासनातुन सेवानिवृत्त नामवंत व्यक्ती. |

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीकरीता सादर.

\\DTENS1\Desk2\Datta\2016\09 BOM NOMEENI (INDUSTRY).Docx